# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि ३१/०८/२०२३

दुखापते :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३७५/२३ कलम ३२४ भादवी | ईर्वीन हॉस्पीटल चे कँन्टीनजवळ अमरावती | दि.३१/८/२३ चे ००.३० वा सुमारास दा.ता.वेळ दि.३१/८/२३ चे ०१.५६ वा | अरुण नारायण राव भोयर वय ६८ वर्ष व्यवसाय मजुरी रा मिराबाई तेलंग यांचे घरी आशियाड कॉलनी शेगाव नाका अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी अरुण नारायण राव भोयर वय ६८ वर्ष व्यवसाय मजुरी रा आशियाड कॉलनी शेगाव नाका अमरावती यांना समक्ष विचारले असता ते वरील पत्यावर राहतात व मजुरीचे काम करतात मी माझे बहीन यांचे घरी राहतो परंतु मला लखवा गेल्यामुळे मागील सात दिवसापासुन मी ईर्वीन हॉस्पीटल येथे भरती होतो व कधी कधी ईर्वीन हॉस्पीटलचे व्हराड्यात राहत होतो दि.३१/८/२३ रोजी १२.३० वा चे सुमारास ईर्वीन हॉस्पीटलचे कँन्टीन जवळ झोपलो असतांना एक अज्ञात ईसम माझे जवळ आला व माझ्या डोक्याखाली असलेला माझा बुट माझ्या डोक्याखालुन काढुन घेतला माझा बुट का घेतला असे विचारले असता त्याने खाली पडलेली वीट उचलुन माझे डोक्यात मारली त्यामुळे माझे डोक्यातुन व नाकातुन रक्त निघाले आजुबाजुला हजर असलेल्या त्या अज्ञात ईसमाला पकडले व मला ईर्वीन हॉस्पीटल येथे उपचाराकरीता भरती केले माझी त्या ईसम विरुध्द तक्रार आहे अशा फिर्यादी वयाणावरुण सदरचा गुन्हा डि ओ सा यांचे आदेशाने दाखल |

चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात **हकीकत** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पोठाणे बडनेरा अप क्र ६४५/२०२३ कलम ३७९ भादंवि | राहेत घर यवतमाळ रोडदुर्गापुर मंदीर जवळ शिवाजी फैल बडनेरा | दि २९/०८/२०२३ चे १२.३० वा १५.४५ वा दाखल दि ३१/०८/२०२३ चे ००.०९ वा | निरंज घनश्याम शर्मा वय ३८ वर्षे रा यवतमाळ रोडदुर्गापुर मंदीर जवळ शिवाजी फैल बडनेरा | अंजीम कुरेशी वय २० वर्षे रा बांद्रा तीन . कंपाउंड मुंबई ह.मु फ्रेजरपुरा कुंभारवाडा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की त्यानी घराचे कलरीग करण्यासाठी ठेकेदार सलीम अब्दुल रज्जाक वय ४६ वर्षे धंदा पेटर रा फ्रेजरपुरा कुंभारवाडा अमरावती यांना दिले त्यांनी दि २५/०८/२०२३ पासुन त्यानी पेंटीगंचे काम त्याचे सोबत चार मजुर घेवुन सुरु केले आज दि ३०/०८/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा रदरम्यान मी घरातील पेंटीगचे काम पाहत असतान घराच्या वरील व्हरांडा ठेवलेला लोखंडीआलमारी ही उघडी दिसली तेव्हा आलमारीठेवलेले दागीने आले नाही व त्यामध्ये ठेवलेले कपडे अस्तव्यस्तदिसले तेव्हा मी माझी पत्नी व भावाला आलमारी ाबाबत विचारपुस केली तेव्हा लक्षात आलेकी आलमारीत ठेवलेले दागिने चोरी झाले आहे म्हणुन मी पेटींग चे ठेकेदार यांना फोन करुन बोलाविले व दागिने चोरी झाल्या बाबत सांगितले असता ठेकेदार सलीम अब्दुल रज्जाक वय ४६ वर्षे धंदा पेटर रा फ्रेजरपुरा कुंभारवाडी यांनी मला सागितले की त्याचे कडे पेटींग कामावर असलेला अंजीम कुरेशी वय २० वर्षे रा बांद्रा तीन . कंपाउंड मुंबई ह.मु फ्रेजरपुरा कुंभारवाडा अमरावती हा भिर्तीचे घसाइचे काम करीत असताना दि २९/०८/२०२३ रोजी दुपारी १२.३० वा दरम्यान त्याचा हात दुखत आहे व दुपारी ०३.४५ वा तब्येत बरोबर वाटत नाही म्हणुन ठेकेदार यांना सागुन घरीत निघुन गेला तेव्हा पासुन तो ठेकेदार सलीम यांना दिसना नाही ठेकेदार यानी त्याची माहीती काढली असता अंजीम कुरेशी यांने राजकमल चौक अमरावती येथील Xpress मोबाईल नावाच्या दुकानातुन एक ६३.००० रु मोबाईल व चार्जर विकत घेतल्याचे समजले आलमारीती ल १)सोन्याची अंगठी ०५ ग्रँम ११ मिली की अ १५.९८५.रु,२)सोन्याची अंगठी ०२ ग्रँम ८१ मीली कि अ ९१३२ रु ,३) सोन्याचे मगंळसुत्र व पेडाँल १४ ग्रँम ८४ मिली कि अ ४२.८३७ असा एकुन ६७९५४ रु चे सोन्याचे दागिने ठेकेदार अब्दुल सलिम अब्दुल रज्जाक यांचे कडे कामावर असलेला अंजुम करेशी पुर्ण नाव माहीत नाही यानेच चोरी केली आहे त्याचेवर कार्यदेशिर कार्यवाही होणे करीता रिपोर्ट देत आहे अशा जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोठाणे बडनेरा अप क्र ६४६/२०२३ कलम ३८०,५११, ४२७ भादंवि | महाराष्ट्र बँक आठवडी बाजार नवी वस्ती बडनेरा | दि ३१/०८/२०२३ चे ०२.४५ वा दाखल दि ३१/०८/२०२३ चे ०५.४१ वा | अक्षय प्रदीप बोरकर वय २९वर्षे रा जनक रेसिडेन्सी नवी वस्ती बडनेरा | अज्ञात | गुन्ह्याची हकीकत अशाप्रकारे आहे की फि यांनी पोस्टे ला रि दिला की ते महाराष्ट्र बँक आठवडी बाजार नवी वस्ती येथे उपशाखा प्रबंधक यापदावर नोकरी करतो आज दि ३१/०८/२०२३ ते मध्यरात्री नंतर ०२.४५ व ा सुमारास मला महाराष्ट्र बाजार येथी ल मुख्यप्रंबधक कुणाल चोरसिया यांचा फोन आला त्यांनी मला फोन वर सांगितले की बँकेला लागुन असलेले ATMमध्ये तोडफोड ,सुरु आहे अशी त्यांनी यंत्रणे मार्फत माहीती मिळालेली आहे मी त्वरीत फोन बंद करुन माझे सहकारी सोबत महाराष्ट्र बँक आठवडी बाजार नवी वस्ती बडनेरा येथे गेलो असाता ATM मधील मॉनिटर स्किन हि निघालेल्या स्थीतीत दिसली कोणीतरी अज्ञात चोरट्याने ATM मधुन पैसे चोरण्याच्या उद्देशाने ATM ची तोडफोड केली त्या चोराचा शोध घेवुन कार्यवाही करीता तक्रार देत आहे ATM मशीन चे नुकसान केले आहे सदरचे नुकसान हे दोन ते तीन लाख झालेले आहे अशा जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

पळवुण नेणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३७८/२०२३ कलम ३६३ भादवी | अमरावती | गु.ता.वेळ दि. ३०/८/२३ चे ०७.३० चे सुमारास<br><br>दा.ता.वेळ दि.३१/८/२३ चे १४.११ वा | पिडीत मुलीचे नातेवाईक | राजा खडसे वय २५ वर्ष रा मांजरखेड ता चांदर रेल्वे जि अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की माझे साळु यांची मुलगी वय १७ वर्ष ९ महीने हि या वर्षीच्या जुन महीन्यात माझे घरी येवुन महीनाभर थांबलेली होती. राजा खडसे हा तीला फुस लावत असल्याचे आमचे लक्षात आल्याने तीला तीचे गावी जाणे करीता बसस्थानक अमरावती येथे सोडले परंतु ती गावाला गेली नाही तीचा शोध घेतला परंतु मिळुन आली नाही वर्णन खालील प्रमाणे मजबुत बांधा रंग गोरा उंची ५ फुट ,केस लांब,डोळे काळे अंगात लाल रंगाचा जीन्स पँन्ट व काळ्या रंगाचे डि शर्ट सोबत कॉलेज बॅंग व कपडे घातलेली असुन ती मुलगी राजा खडसे रा मांजरखेड ता चांदररेल्वे जि अमरावती यांने पळवुन नेले वरुण पो.स्टे ला अप क्र ३७८/२०२३ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पो ठाणे सीट कोतवाली अप क्र.३७७/२३ कलम १२२ मपोका | बस डेपो अमरावती | घटणा .ता वेळ दि.३१.०८.२०२३ चे ००.३०वा<br><br>दाखल ता वेळ दि.३१.०८.२०२३ चे ०३.०२वा | सरतर्फे ASI राजेश सपकाळ बं नं ६२४ पो.स्टे सिटी कोतवाली अमरावती | अनिल वंसतराव सवळकर वय ४५ वर्ष रा लढ्ढा प्लॉट नवी वस्ती आमद पुरा बडनेरा अमरावती<br>ह.मु बौध्द विहाराजवळ वडाळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे् आहे की मी पो.स्टे सिटी कोतवाली येथे तैनातीस असुन डि बी ईन्चार्ज म्हणुन कान करतो आज दि.३०/८/२३ रोजी रात्री २१.०० वा दि.३१/८/२३ चे ०९.००वा पावेतो माझे सोबत नापोका दिपक बं नं २९६ पोका १७७६ सह वरीष्ठाचे आदेशाने पेट्रोलींग डयुटी असतांना दि.३१/८/२०२३ चे ००.३० वा दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक बातमी मिळाली की एक ईसम बसडेपो अणरावती येथे अधारात चोरी करण्याचे उद्देशाने तोंडाला बाधुन संशईत रित्या हालचाली करतांना मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव नामे अनिल ंसतराव सवळकर वय ४५ वर्ष रा लढ्ढा प्लॉट नवी वस्ती आमद पुरा बडनेरा अमरावती ह.मु बौध्द विहाराजवळ वडाळी अमरावती असे सांगीतले त्याला अंधारात लपुन बसण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली वरुण त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे अगावर कोणतेही मैल्यावान वस्तु अगर त्याचे शरीरावर कोणतेही प्रकारचा मार मिळुन आला नाही वरुण सदर आरोपींना पो.स्टे सिटी कोतवाली येथे आमुन त्याचे विरुध्द कलम १२२ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :–

| अ.क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यु गुरा व कलम | फिर्यादी चे नाव | वारस बेवारस | हॉस्पिटल ठिकाण | मयताचे ।ांव | वय वर्ष | स्त्रीपुरुष | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ | |
| | खोलापुरी गेट अमरावती | 28/2023 कलम 174 जा फौ<br><br>घटना ता वेळ 31.08.2023 चे 12.10 पुर्वी<br>दाखल ता वेळ 31.08.2023 चे 13.25 वा | पिडीत महिलेचा नातु | वारस | इर्वीन दवाकाना अमरावती | एक महिला | 75 | स्त्री | आम्ही ना पो कॉ राजेस घुरडे ब. नं 757 पो. स्टे खोलापुरी गेट आज 08.00 वा ते 14.00 वा पर्यंत स्टेशन डायरी ड्युटी असतांना पो. स्टे ला फिर्यादी यांनी येवुन जबानी रिपोर्ट दिला की त्यांची आजी हिला बिपी, शुगर, दमा, कानाने कमी एकने डोळ्याने कमी दिसणे असे आजार होते ती घरात चिडचिड करीत होती व जिवाचे बरेवाईट करुन घेतो असे म्हणत होती आज दिनांक 31.08.2023 रोजी सकाळी 11.14 वा पुर्वी घरात कोणी नसतांना घरात ठेवलेल्या रॉकेल अंगावर घेवुन स्वतः जाळुन घेतले व मरण पावली पोलीसआलेवर उपचार करीता उर्वीन दवाखाना येथे नेले डॉक्टरांनी मरण पावल्याचे सांगीतले मृत्यु बाबत तक्रार नसल्याचे सांगतात अशी फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | पोस्टे राजापेठ मर्ग क्र. ८७/२०२३ कलम १७४ जा.फौ. | अमरावती<br><br>घ.ता.वेळी दि. १३/०८/२०२३ चे ११-५८ वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. ३१/०८/२०२३ चे १५-२५ वा. | एक महिला | सरतर्फे पोहेका मिरा उईके ब.नं. १५३ , पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर | पोहेका मिरा उईके ब.नं. १५३ , पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर आज दि. ३१/०८/२०२३ रोजी ०८-०० वा. ते १४-०० वा. पावेतो स्टेशन डायरी ड्युटी असतांना आज रोजी गुन्हे शाखा येथुन मर्ग वर्ग /३२२२/२०२३ कार्यालय पो. आयुक्त अम. दि. ३०/०८/२०२३ वपोनि राजापेठ सदर्भ आर/सीआरबी/मर्ग वर्ग /१३८२/२०२३ दि. २५/०८/२०२३ पो.स्टे. अजनी नागपुर शहर मर्ग क्र. ००/२०२३ कलम १७४ जा.फौ. केस डायरीबाबत पो.स्टे. अजनी नागपुर शहर येथुन अकस्मात मर्ग ००/२०२३ चे कागदपत्रावरील संदर्भानुसार इकडील कार्यालयास प्राप्त झाल्याने त्याचे अवलोकन केले असता मृतक हि सहा महिन्याची गरोदर होती. तिची दि. ११/०८/२०२३ चे दुपारी ०३-३० वा ते ०४-००वा. दरम्यान राहत्या घरी राजापेठ हद्दीत प्रकृती खराब झाली . उपचाराकरीता प्रथम उपचार डॉ. रेवती ढक्के अमरावती नंतर रेफर इर्विन दवाखाना अमरावती प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने पुढील उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. १३/०८/२०२३ रोजी भर्ती केले. उपचार चालु असतांना दि. १३/०८/२०२३ रोजी मरण पावली. सदर अकस्मात मृत्युचे घटनास्थळ चवरे नगर झोपडपट्टी सुत गिरणी जवळ पो.स्टे. राजापेठ जि. अमरावती असल्याने मुळ कागदपत्र सोबत जोडुन सदरचा मर्ग दाखल |

जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | खोलापुरी गेट अमरावती | 185/2023 कलम 12 अ म जु का | सक्करसाथ शनि मंदीरा जवळ अमरावती | 31.08.2023 चे 13.40 वा दरम्यान | 31.08.2023 चे 15.32 वा | सर तर्फे पो हे कॉ राम लोखंडे ब. नं 1114 पो. स्टे खोलापुरी गेट अमरावती | धर्मेंद्र जुगलकिशोर नरबान वय 55 वर्ष रा इंद्रभवन थिएटर जवळ बुधवारा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व पो. स्टॉफसह नमुद घटना स्थील रेड केली असता एएक इसम हा वरली मटका नावाचा पैशाचे हारजित चा जुगार खेळ खेलत आहे अशा माहीती वरुन पंचा समक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन जप्ती पंचनाम्या प्रमाणे वरली मटका लिहीलेल्या चिठ्ठ्या एक बॉल पेन कि 5 रु , जुगाराते नगदी 2540 असा एकुण 2545 रु चा माल मिळुन आल्याने सदर आरोपीचे विरुध्द कलम 12 अ म जुका प्रमाणे दाखल करुन तपासात घेतला |

प्रोव्हीशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप नं ६९८/२०२३ कलम ६५ ई मदाका | फ्रेजरपुरा बडी नगिना मस्जीद मागे अमरावती | दि ३०/८/२०२३ चे २२/३० वा. | दि ३१/०८/२०२३ चे ००/४३ वा. | सपोउपनी राजेंद्र मानिकराव काळे बन ८५३ गुन्हे शाखा अमरावती शहर | इकबाल भैययालाल चौधरी वय ३७ रा फ्रेजरपुरा बडी नगिना मस्जीद मागे अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे पो स्टे हददीत पेट्रोलीग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन खाद्रीलायक माहीती मिळाले वरुन नमुद आरोपीवर पंच व पो स्टाफचे मदतीने प्रो रेड केली असता नमुद आरोपीचे कब्जातुन १) ११ नग देशी दारू बॉबी संत्रा १८० एमएल च्या सिलबंद पावटया कि अ ७७०/रु 2) 16 नग देशी दारू टॅगोपंच ९०एमएल च्या सिलबंद पावटया कि अ ५६०/रु असाएकुन १३३०/रु प्रोव्ही माल अवैधरीत्या विनापरवाना मिळुन आला वरुन पंचासमक्ष नमुद मुददेमाल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने नमुद आरोपी विरुध्द फिर्यादीचे लेखी फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पोलीस स्टेशनफ्रेजरपुरा अमरावती शहर | अप नं ६९९/२०२३ कलम ६५ ई मदाका | अमरावती | दि ३१/८/२०२३ चे ११/४५ वा. | दि ३१/०८/२०२३ चे १५/०४ वा. | पोहवा योगेश श्रीवास ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | **एक महिला** | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे मा व पो नी सा यांचे आदेशाने पो स्टे हददीत डी बी पथकातील कर्मचारी सह पेट्रोलीग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक माहीती मिळाले वरुन नमुद आरोपीवर पंच व पो स्टाफचे मदतीने प्रो रेड केली असता नमुद आरोपीचे कब्जातुन अवैधरीत्या विनापरवाना २५ लिटर गावठी हात भटटी दारू कि अ ५०००/रु चा प्रोव्ही मुददेमाल मिळुन आला वरुन पंचासमक्ष नमुद मुददेमाल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने नमुद आरोपी विरुध्द फिर्यादीचे लेखी फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पोलीस स्टेशनफ्रेजरपुरा अमरावती शहर | अप नं ७००/२०२३ कलम ६५ ई मदाका | आरोपी चे राहते घरा समोर गवळीपुरा फ्रेजरपुरा अमरावती | दि ३१/८/२०२३ चे १२/३० वा. | दि ३१/०८/२०२३ चे १६/०८ वा. | पोहवा योगेश श्रीवास ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | रन्नु रमजान रायलीवाले वय ५९ रा गवळीपुरा फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे मा व पो नी सा यांचे आदेशाने पो स्टे हददीत डी बी पथकातील कर्मचारी सह पेट्रोलीग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक माहीती मिळाले वरुन नमुद आरोपीवर पंच व पो स्टाफचे मदतीने प्रो रेड केली असता नमुद आरोपीचे कब्जातुन अवैधरीत्या विनापरवाना २० लिटर गावठी हात भटटी दारू कि अ ४०००/रु चा प्रोव्ही मुददेमाल मिळुन आला वरुन पंचासमक्ष नमुद मुददेमाल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने नमुद आरोपी विरुध्द फिर्यादीचे लेखी फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | **पो स्टे गाडगे नगर अम** | **अप क्र १०७४/२०२३ कलम ६५ ई मदाका** | **शेगाव प्रगती शाळेजवळ अमरावत** | **३०.०८.२०२३ चे २२.१५ वा** | **३१.०८.२०२३चे ०००.०९वा** | **पोहेकॉ संजय इंगळे ब न १०६ पो स्टे गाडगे नगर अमरावती** | **प्रफुल राजेंद्र रामटेके वय ३० वर्ष रा शेगाव प्रगती शाळेजवळ अमरावती** | **हकीकत अशा प्रकारे आहे नमुद घतावेळी व ठीकाणी फीर्यादी पो स्टॉफ यांना पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीवरुन प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी हा त्याचे ताब्यातून घटनास्थळावरुन १९ नग देशी दारु पावटया मिळलून आल्या त्यापैकी ११ नग देशी दारु बॉबी संत्रा ९० मिली सिलबंद प्लास्टीक बॉटल असे एकुन १९ बॉटल देशी दारु किंमत अंदाजे ७००/- रु चा विक्री करीत असतांना मिळून आला.वरुन त्याचेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल** |

प्रोव्हीशन

| अ. क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| | पो.स्टे. नांदगाव पेठ अप.क्र. ३४०/२३ कलम ६५(ई) म.दा.कायदा | चाणक्य हॉटेल रहाटगाव | दि.३१/०८/२३ चे १०/३० वा. | दि.३१/८/२३ चे १२/२८ वा. | सरतर्फे पोऊपनि गजानन लोकडे पो.स्टे. नांदगाव पेठ | १) राहुल अंबादास सुखदेवे वय ३२ वर्ष रा हॉटेल चाणक्य रहाटगाव समजपत्रावर रिहा<br><br>२) अक्षय रावसाहेब ठाकरे वय ३२ वर्षे रा. अचलपुर जि अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि यांची पो स्टॉफ सह पो स्टे हद्दीत प्रो रेड ड्युटी असतांना पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली कि एक इसम चाणक्य हॉटेल रहाटगाव येथे ईंग्रजी दारुची विक्री करीत आहे अशा खबरे वरुन नमुद व्यक्तीवर प्रो रेड केली असता हॉटेलच्या किचन रुमची पाहणी केली असता १) ब्लेंडर प्राईड १८० एम एल ३ नग कि ५०० रु २) रायल चँलेंज १८० एम एल ४ नग कि ८०० रु ३) टुबर्ग बियर ६५० एम एल कि १२०० रु असा एकुण कि अ ३५०० रु चा माल मिळुन आला. अशा फिर्यादी यांचे लेखी फिर्यादी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे / अप क्रं | घटनास्थळ | गुन्हा घडला ता. व. वेळ,माहिती मिळाल्याची ता. वेळ , दा. ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३७४/२३ कलम ६५(ई) महाराष्ट्र | १८ देशी दारु टँगो पंच पावट्या ९० एम एल कि.७२० रु चा प्रोव्ही माल | उस्मानिया मज्जीद कडुन बसस्टँन्ड कडे जाणारा रस्ता अमरावती | दि.३१/८/२३ चे ०००.३० वा दा.ता.वेऴ दि. ३१/८/२३ चे ०१.३१ वा | ASI राजेश सपकाऴ बं नं ६२४ पो.स्टे सिटी कोतवाली अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की पो.स्टे सिटी कोतवाली येथे तैनातीस असुन डि बी ईन्चार्ज म्हणुन कान करतो आज दि.३०/८/२३ रोजी रात्री २१.०० वा दि.३१/८/२३ चे ०९.००वा पावेतो माझे सोबत नापोका दिपक बं नं २९६ पोका १७७६ सह वरीष्ठाचे आदेशाने प्रोव्हीजन रेड जुगार रेड करीता डयुटी असतांना आद दि.३१/८/२०२३ चे १२.३० वा चे सुमारास गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक बातमी मिऴाली की एक ईसम उस्मानिया मज्जीद कडुन बस स्टँन्ड कडे आपले हातात एक नॉयलॉन थैली मध्ये अवैध्यरित्या देशी दारु विक्री साठी नेत आहे सदर ईसम हा पायदऴ बसस्टँन्ड कडे जात आहे अशआ खभऱई ऴऱउण आम्ही सोबत पंचनाम्यातील नमुद पंच घेवुन खाजगी वाहनाने समाधान नगर रोड कडे जाणा-या रोड जवऴ गेलो असता एक ईसम पायदऴ आपले हातात पिशवी घेवुन येत असतांना दिसला त्यास हाताचा ईशारा देवुन थांबवेले व आमचा परीचय देवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव पवन रामचंद्र तरोची वय ३४ वर्ष रा समाधान नगर असे सांगीतले त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये १८ देशी दारु टँगो पंच पावट्या ९० एम एल कि.७२० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | . दारुबंदी कायदा | | | | | रु चा प्रोव्हीबीशन माल मिळुन आला त्यास सदर मालाबाबत परवाना विचारला असता नसल्याचे सांगीतले वरुण सदरचा माल पंचासमक्ष पंचनामा करुन जागीच जप्त करण्यात आला सदर आरोपी हे कृत्. कलम ६५(ई) महा.दारुबंदी कायद्याप्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द माझी कायदेशार फिर्याद आहे |
| २ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३७६/२३ कलम ६५(ई) महाराष्ट्र. दारुबंदी कायदा | १५ देशी दारु दारुच्या पावट्या ९० एम एल कि.६००० रु चा प्रोव्ही माल | बसस्टँन्ड रोडवर व्ही एस एम हॉटेल जवळ अमरावती | दि.३१/८/२३ चे ०१.१५वा दा.ता.वेळ दि. ३१/८/२३ चे ०२.२३ वा | ASI राजेश सपकाळ बं नं ६२४ पो.स्टे सिटी कोतवाली अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की पो.स्टे सिटी कोतवाली येथे तैनातीस असुन डि बी ईन्चार्ज म्हणुन कान करतो आज दि.३०/८/२३ रोजी रात्री २१.०० वा दि.३१/८/२३ चे ०९.००वा पावेतो माझे सोबत नापोका दिपक बं नं २९६ पोका १७७६ सह वरीष्ठाचे आदेशाने प्रोव्हीजन रेड जुगार रेड करीता डयुटी असतांना आद दि.३१/८/२०२३ चे ०१.१५ वा चे सुमारास गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक बातमी मिळाली की एक ईसम बसस्टँन्ड रोडवर व्ही एस एम हॉटेल जवळ दारुचे दुकानाच्या गल्लीत बसुन कडे आपले हातात एक नॉयलॉन थैली मध्ये अवैध्यरित्या देशी दारु विक्री करीत अशा मिळालेल्या माहीती वरुण आम्ही सोबत पंचनाम्यातील नमुद पंच घेवुन खाजगी वाहनाने अमरावती बस डेपो रोडवरील व्ही एस एम हॉटेल समोर दारुचे दुकानाच्या गल्लीत आलो असता एक ईसम देशी दारुची विक्री करतांना दिसुन आला त्याचे जवळ जावुन आमचा परीचय देवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ए यश राजेश गुप्ता वय २० वर्ष रा मसानगंज अमरावती असे सांगीतले वरुण त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये १५ देशी दारु दारुच्या पावट्या ९० एम एल कि.६००० रु चा प्रोव्ही माल मिळुन आला त्यास सदर मालाबाबत परवाना विचारला असता नसल्याचे सांगीतले वरुण सदरचा माल पंचासमक्ष पंचनामा करुन जागीच जप्त करण्यात आला सदर आरोपी हे कृत्. कलम ६५(ई) महा.दारुबंदी कायद्याप्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द माझी कायदेशार फिर्याद आहे |

जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम | अप क्र १०५४/२०२३ कलम १२ अ मजुका | वलगाव रोड येथील हनुमान मंदीर जवळ अमरावत | ३०.०८.२०२३ चे १७.०० वा | ३१.०८.२०२३ चे ०१.११ वा | पोउपनि गणेश राउत पो स्टे गाडगे नगर अमरावती | नानकसिंग टेहलसींग बावरी वय ४८ वर्ष रा. तळेगाव शामजी पंत जि. वर्धा , २. सुभाष वामनराव कदम वय ५५ वर्ष रा. तळेगाव शामजी पंत जि. वर्धा ० | हकाकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि.ला मिळालेया माहीतीवरुन जुगार रेड केली असता सदर दोन इसम यांना जागीच मिळुन आले पंचासमक्ष अंगझडती घेतली असता आरोपी क्र १. नानकसिं टेहलसिंग बावरी याचे ताब्यातून जुगार खेळ खेळातीली ४५०/- रु नगदी , २. सुभाष वामनराव कदत याचे ताब्यातून जुगार खेळीतील २५०/- रु तसेच एम एच २७ डी एम ६५३३ किं.अं. ५०,०००/- असा एकूण ५०,७५०/- - रु.चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. अशा फि.च्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्ह ादखल करुन तपासात घेतला. लागलीच दाखल. |